# हिंदुबोध

संपादक: श्रीपाद श्रीकांत रामदासी.

■ शके १९४८ ■ वर्ष २६ ■ अंक ०६ ■ सप्टेंबर २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या २८
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 26 ■ ISSUE NO 06 ■ September 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 28




## गणपती बाप्पा मोरया

# शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी, आता मदत जनता बँकेची!



जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना

शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज

देशांतर्गत शिक्षणासाठी ₹50* लाख | परदेशी शिक्षणासाठी ₹1* कोटी | आकर्षक व्याजदर

*अटी व नियम लागू.

जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 | www.jsblpune.bank.in

मासिक

**हिंदुबोध**

**वर्ष – सव्वीसावे : अंक ६ वा**

शके १९४८

**सप्टेंबर २०२६**



संपादक

**श्रीपाद श्रीकांत रामदासी**

shripad.ramdasi@outlook.com

निवास

**सी १०२, आमराई सोसायटी,श्री पद्मावती देवी मंदिराजवळ, चव्हाण बाग, डी एस के विश्व रस्ता, धायरी ४११०४१.**

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

संपादक मंडळ

श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री

श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री

श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष

श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख

श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख

श्री. अनिल सांबरे – नागपूर

श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य

श्री. नितीन वाटकर

प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार

व्यवस्थापक

मनोज शेलार

मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

मुद्रण स्थळ

संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.

दूरभाष : २४४८ ५६ ३२

sanwadpvt@gmail.com


# अनुक्रमणिका


✦ संपादकीय.... सार्वजनिक गणेशोत्सव : संस्कृतीपासून निर्मितीकडे
श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी .................... ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ................................................ ०७

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .................................... ११

✦ देवदूत – एक सॉफ्ट टारगेट
डॉ. संजीव दात्ये .................................. १३

✦ व्रतांचा व सणांचा राजा श्रावण
संत साहित्य वरून साभार ....................... १४

✦ रिंगच्या बाहेरही देशासाठी लढली लव्हलीना
जयंत केसकर...................................... १५

✦ अष्टविनायका तुझा महिमा असा – लेखमाला १ ते ८
श्रीपाद श्रीकांत रामदासी.......................... १८



प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

’हिंदुबोध’ मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विजयकुमार पिसे यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : श्रीकांत रामदासी (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**“Hindu Bodh” Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vijaykumar Pise, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Shrikant Ramasasi**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## ॐ नमोजी आद्या

**ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या।।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।**
**देवा तूंचि गणेशु। सकलमती प्रकाशु।।**
**म्हणे निवृत्ती दासु। अवधारिजो जी।।**
**अकार चरण युगुल। उकार उदर विशाल।**
**मकर महामंडल। मस्तकाकारे।।**

**हे तिन्ही एकवटले। तेथे शब्दब्रम्ह कवळले।**
**ते मिया श्रीगुरुकृपा नमिले। आदिबीज।।**
**आता अभिनव वाग्विलासिनी।**
**जे चातुर्यार्थ कलाकामिनी।**
**ते श्री शारदा विश्वमोहिनी। नमिली मिया।।**

**संत ज्ञानेश्वर**

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. श्रीपाद रामदासी**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**प्रा. गजानन धारणे**
(प्रांत अध्यक्ष)

# सार्वजनिक गणेशोत्सव : संस्कृतीपासून निर्मितीकडे

**संपादकीय**

भारतीय संस्कृतीमध्ये सण–उत्सवांना केवळ धार्मिक महत्त्व नाही, तर सामाजिक एकोपा, संस्कार आणि समाजजागृतीचेही मोठे स्थान आहे. सार्वजनिक गणेशोत्सव हा त्याच परंपरेचा एक प्रभावी भाग आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक आणि राष्ट्रीय एकजुटीचे स्वरूप दिले. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ गणपतीची आराधना करण्याचा उत्सव न राहता समाजाला एकत्र आणणारे आणि राष्ट्रभावना जागृत करणारे व्यासपीठ बनले.

आजच्या आधुनिक आणि वेगाने बदलणाऱ्या काळात सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूपही अधिक व्यापक झाले पाहिजे. मोठे मंडप, आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि मनोरंजन यापलीकडे जाऊन समाजहित आणि राष्ट्रनिर्मितीचा विचार गणेशोत्सवाच्या केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे.

- **युवकांची जबाबदारी**

आजचा युवक हा देशाचा केवळ भविष्यकाळ नाही, तर वर्तमानकाळातील सर्वात मोठी शक्ती आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या आयोजनात युवकांचा मोठा सहभाग असतो. त्यामुळे या सहभागाचे रूप केवळ मिरवणूक, सजावट आणि मनोरंजनापुरते मर्यादित न राहता समाजोपयोगी उपक्रमांकडे वळले पाहिजे.

युवकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, वाहतूक शिस्त, व्यसनमुक्ती जनजागृती, डिजिटल साक्षरता, महिला सुरक्षा आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत अशा उपक्रमांचे आयोजन करावे.

तसेच सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करून सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवणे हीदेखील आजच्या युवकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

- **उत्सवातून राष्ट्रनिर्मिती**

राष्ट्रनिर्मिती ही केवळ सरकारची किंवा काही निवडक व्यक्तींची जबाबदारी नाही. प्रत्येक नागरिकाच्या छोट्या–छोट्या जबाबदार कृतीतून राष्ट्र मजबूत होते.

- **गणेशोत्सवाच्या काळात आपण काही प्रश्न स्वतःला विचारले पाहिजेत –**

आपला परिसर स्वच्छ आहे का?

आपण वाहतुकीचे नियम पाळतो का?

आपण सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करतो का?

आपण पर्यावरणाची काळजी घेतो का?

आपण गरजू व्यक्तीला मदत करतो का?

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपण एक जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडतो का?

या प्रश्नांची सकारात्मक उत्तरे देण्याचा संकल्प जर प्रत्येक गणेश मंडळाने आणि प्रत्येक युवकाने केला, तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीचे माध्यम बनेल.

- **पर्यावरणपूरक गणेशोत्सव**

गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषासोबत पर्यावरण वाचवा हा संदेशही तितक्याच ताकदीने समाजापर्यंत पोहोचला पाहिजे. शाडू मातीच्या मूर्तींना प्राधान्य, नैसर्गिक सजावट, ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण आणि निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन यांसारख्या गोष्टींचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे.

भक्ती आणि पर्यावरण संवर्धन हे एकमेकांच्या विरोधात नाहीत; उलट निसर्गाचे रक्षण करणे ही देखील ईश्वरसेवाच आहे.

- **एकतेचा संदेश**

सार्वजनिक गणेशोत्सवाची सर्वात मोठी ताकद म्हणजे एकजूट. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक

स्तर यांचा विचार न करता समाजाला एका व्यासपीठावर आणण्याची क्षमता या उत्सवात आहे.

गणेशोत्सवातून मतभेद वाढवण्याऐवजी मनभेद कमी झाले पाहिजेत. स्पर्धेपेक्षा सहकार्य, दिखाव्यापेक्षा सामाजिक बांधिलकी आणि खर्चापेक्षा समाजोपयोगी कार्याला महत्त्व मिळाले पाहिजे.

- **युवकांनी पुढाकार घ्यावा**

आजचा युवक तंत्रज्ञानाने सक्षम आहे, माहितीने समृद्ध आहे आणि बदल घडवून आणण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. त्यामुळे प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या परिसरातील एखादी सामाजिक समस्या स्वीकारून तिच्यावर वर्षभर काम करण्याचा संकल्प करायला हवा.

एक गणेश मंडळ – एक सामाजिक उपक्रम, हा विचार जर महाराष्ट्रातील प्रत्येक मंडळाने स्वीकारला, तर गणेशोत्सवाची सामाजिक शक्ती कित्येक पटींनी वाढू शकते.

गणेशोत्सवातील दहा दिवस केवळ उत्सवाचे नसावेत; ते संस्कार, सेवा, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारे दिवस असावेत.

शेवटी, गणरायाकडे आपण केवळ सुख–समृद्धीची मागणी न करता अशी प्रार्थना करूया–

हे गणराया, आम्हाला बुद्धी दे, शक्ती दे आणि आपल्या समाजासाठी व राष्ट्रासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा दे.

कारण सजावट कितीही भव्य असली तरी उत्सवाची खरी शोभा समाजासाठी केलेल्या कार्यात असते.

गणपती बाप्पा मोरया!

**मंगलमूर्ती मोरया!**

**एक सारे होऊ या!**

**राष्ट्र बलशाली करूया!**

**श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

## एसआयटी अहवालात चंपत राय क्लीन चिट

**अयोध्या :** राम मंदिर चढावा चोरी प्रकरणात महासचिव चंपत राय यांनाच लक्ष्य केले होते. यासंदर्भात एसआयटीचा चौकशीअंती अहवाल आला असून ज्यांच्यावर सर्वाधिक आरोप झाले होते, त्यामध्ये चंपत राय यांना एसआयटीने क्लीन चिट दिली आहे. दरम्यान चंपत राय रामकोट भवनात चातुर्मास मौन व्रत साधनेत व्यस्त आहेत.

अयोध्येतील राम मंदिरातील चढावा चोरी प्रकरणात संघ, विहिंप यांना लक्ष्य करणारा नॅरेटिव्ह देशभरात केला गेला. यामुळे देशभरातील रामभक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या. पण शेवटी अग्नी परीक्षेत दूध का दूध...हेच समोर आले. तसेच माध्यमांनीही मिडिया ट्रायल चालवला. निंदनीय आरोप केले गेले. ते सारे तोंडघशी पडले आहेत.

राम मंदिर दान चोरी प्रकरणात आज मंगळवारी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. या प्रकरणाचा तपास करणार्या विशेष तपास पथकाच्या अहवालाकडे सार्यांचे लक्ष होते. एसआयटीने श्रीराम जन्मभूमी मंदिराचे माजी महासचिव चंपत राय यांना क्लीन चिट दिली आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या गृह विभागाने एसआयटीची स्थापना केली होती. वास्तविक राम मंदिर ट्रस्टनेच अशा चौकशीची मागणी केली होती. या अहवालात चंपत राय यांचे नाव आरोपी म्हणून कुठेही नाही. चंपत राय यांना हा मोठा दिलासा आहे.

दरम्यान या अहवालात एसआयटीनं केवळ आठ जणांना आरोपी ठरवले आहे. अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पांडे, रमाशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव, रमाशंकर यादव ऊर्फ टिन्नू यांच्या नावांचा समावेश अहवालात आहे. मात्र अनिल मिश्रा अद्याप चौकशीच्या फेर्यात आहेत.

दरम्यान चंपत राय अयोध्येच्या रामकोट तीर्थ क्षेत्र भवनात चार महिने चार्तुमास साधना सुरू करत आहेत. २१ नोव्हेंबरपर्यंत अयोध्येत राहून राम मंत्राचा जप आणि रामचरितमानस पठण करण्याची घोषणा त्यांनी केली होती.

विजयकुमार पिसे


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**



## विश्व हिंद परिषद

सार्वजनिक आरोग्य विभाग धन्वंतरी ऑर्गनायझेशन फॉर सोशियो हेल्थ अवयवदान आरोग्य सेवा दोस्त मुंबई पनवेल संस्थेच्या वारीमध्ये अवयव दान याबद्दल संबोधन करणाऱ्या कार्यकर्त्यांची भेट झाली. विश्व हिंदू परिषद आरोग्यसेवा गेली ४० वर्ष अविरत सेवा करीत आहे. त्याबद्दल दान संस्थेच्या कार्यकर्त्यांना सविस्तर माहिती दिली. व त्यावेळी त्या संस्थेकडून आपल्या सेवा कार्यास एक ट्रॉफी प्रदान करण्यात आली. त्यावेळी श्री. गोडबोले भास्कर व श्री. देशपांडे यशवंत व बाळासाहेब वाघ यांनी त्या ट्रॉफीचा स्वीकार केला त्याचे छायाचित्र सोबत जोडत आहे. या वारीमध्ये मेडिकल सेवा केली. ड्रेसिंग, इंजेक्शन तसेच इतर ही सेवा केली जाते. दोन डॉक्टर, परिचारिका, नर्स, कार्यकर्ते यांचा समावेश यामध्ये असतो.

कार्यकर्ता, विहिंप

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

## कराटे क्लासमध्ये अखंड भारत संकल्प दिन



सोलापूर : शुक्रवार १४ऑगस्ट रोजी अखंड भारत संकल्प दिनाच्या निमित्ताने फाळणी, अखंड हिंदुस्थान याबरोबरच नशामुक्त अभियानचा उपक्रम बजरंग दल, दुर्गा वाहिनी आणि मातृशक्ती आयामच्या वतीने अक्कलकोट, मार्कंडेय महामुनी प्रखंड, अशोक प्रखंड, माधव नगर, दयानंद नगर आणि वीर हनुमान प्रखंड येथे झाला.

मातृशक्ती आयाम (जिल्हा सोलापूर) वतीने अखंड भारत संकल्प दिन अशोक प्रखंडामधील कर्णिकनगर भागातलि मिलिट्री मार्शल आर्ट अँड सेल्फडिफेन्स ट्रेनिंग अकॅडमी कराटे क्लासच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

प्रारंभी भारत मातेचे पूजन कराटे अकॅडमीच्या प्रमुख ब्लॅक बेल्टपटू श्रीमती अनुराधाताई थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. विश्व हिंदू परिषदचे विभागमंत्री श्री विजयकुमार पिसे यांनी अखंड भारत पार्श्वभूमी, सद्य स्थिती आणि संकल्प तसेच नशामुक्तीची गरज, ज्यामुळे तरुणाईला या विळख्यातून बाहेर पडण्याची गरज असल्याचे आवाहन केले. मातृशक्ती जिल्हा संयोजिका सौ. माधुरीताई एकबोटे यांनी अखंड भारत संकल्पना मांडताना अखंड हिंदुस्थानचा पूर्वेतिहासाविषयीचे वर्णन केले. प्रखंड संयोजिका सौ. रामेश्वरीताई बिर्रु यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी कराटेपटूंचे पालक यांची देखील उपस्थिती होती.

भारतमातेचा जयघोष व स्वातंत्र्य चळवळीतील हौतात्म्याना अभिवादनाने समारोप झाला.

वार्तांकन : विजयकुमार पिसे, विभाग मंत्री

---

## अखंड भारत संकल्प दिनी वीर हनुमान प्रखंडात रक्तदान शिबीर




सोलापूर : १४ ऑगस्ट अखंड भारत संकल्प दिन व स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वीर हनुमान प्रखंडाच्या वतीने हत्तुरे वस्ती विमानतळ भागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराची सुरुवात भारत माता पूजन, वंदे मातरमने करण्यात आली. यावेळी ४८ दात्यांनी रक्तदानात योगदान दिले. जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत व प्रभाग २५ चे नगरसेवक वैभव हत्तुरे व गुरुकृपा क्लिनिकचे डॉ. राजकुमार पाटील व विश्व हिंदू परिषदेचे विभाग मंत्री विजयकुमार पिसे, सहमंत्री संजयकुमार जमादार, जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

१४ ऑगस्ट भारताची फाळणी कशी, याविषयावर ॲड. राजपूत यानी मनोगत मांडले. भारत स्वातंत्र दिनानिमित्त नगरसेवक वैभव हत्तुरे यांनी माहिती दिली. व जयदेव सुरवसे व्यसनमुक्ती या विषयावर युवकांना मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते महेश आठवले व नितीन भोपळे, कल्पनाताई जगदाळे याप्रसंगी उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वीतेसाठी वीर हनुमान प्रखंडाचे मंत्री सुरज मोरे, श्रीराम नवमी समितीचे अध्यक्ष ऋषिकेश ताटे व पुण्यश्लोक साम्राज्य संस्थेचे अध्यक्ष विशाल पाटील, विहिंप दक्षिण सोलापूर प्रखंड सहमंत्री अजय गवसने, दीपक जळके आनंद डांगे, अप्पू कांबळे, श्रीकांत धुमाळ, ओमकार कोरे यांचीही उपस्थिती होती.

वार्तांकन : विजयकुमार पिसे, विभाग मंत्री

## ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;
# श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

* ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
* ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
* ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
* ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
* ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^{2}$ प्रकल्प
* ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
* ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

या चांगल्या गोष्टी/बातम्या आपणास आवडल्या तर पुढे कोणालाही पाठवाव्यात. आवडल्या नाहीत, तर मला कळवावे, अजिबात राग येणार नाही.

१) भारतीय रेल्वेने विद्युतीकरणाचा फार मोठा टप्पा गाठला आहे. जवळपास ९९.६०% ब्रॉडगेज मार्गाचे विद्युतीकरण झाले आहे. जगामध्ये स्वित्झर्लंड (१००% विद्युतीकरण) पाठोपाठ आता भारताचा दुसरा क्रमांक आहे. २०१९ पासून १५ किलोमीटर प्रतिदिन पेक्षा जास्त वेगाने विद्युतीकरण केले जात आहे. विद्युतीकरणामुळे रेल्वे चा वाहतुकीचा खर्च हा डिझेलच्या खर्चाच्या जवळपास ५०% ने कमी झाला आहे. २०१५-१६ मध्ये २९३ कोटी लिटर डिझेल प्रति वर्ष लागत होते. ते डिझेल आता लागत नाही. तसेच कार्बन डाय ऑक्साईड प्रदूषण ही खूप कमी झाले आहे. एक टन मालवाहतूकीसाठी प्रति किलो मीटर, रस्त्याने केल्यास कार्बन डाय ऑक्साईड प्रदूषण १०१ ग्रॅम तर रेल्वेने केल्यास फक्त ११.५ ग्रॅम होते (८९% कमी).

भारतात सध्या १३,५६९ विद्युत इंजिन आहेत. रेल्वेची विजेची गरज ही २९,५७० लाख युनिट प्रति महिना असून यातील ८५% वीज ही वाहतुकीसाठी, तर १५% वीज ही रेल्वे स्टेशन व अन्य गोष्टीसाठी वापरली जाते. २०२४-२५ मध्ये रेल्वेने विजेसाठी ३४,००० कोटी रुपये खर्च केले. रेल्वेची २,६०० पेक्षा जास्त स्टेशन ही सध्या संपूर्णपणे सौर ऊर्जेवर आहेत. रेल्वेने सध्या १,१३९ चथ क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारले आहेत. यातून सध्या रेल्वेच्या एकूण गरजेच्या फक्त ५ ते ७% वीज उपलब्ध होते. पण भारतीय रेल्वेचा प्रयत्न आहे की रेल्वेला लागणारी सर्व वीज ही २०३० पर्यंत अक्षय ऊर्जा असेल.

२) जुलै मधील पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदीजी यांच्या इंडोनेशिया दौऱ्यात, भारताकडून ६३ कोटी डॉलर(६,००० कोटी रुपये) ची शस्त्र खरेदी करण्याचा करार झाला. यामध्ये २० कोटी डॉलरच्या २ ब्रह्मोस बॅटरीज असून उर्वरित रकमेत हवेतून हवेत मारा करणारी -ीीर चघ-१ क्षेपणास्त्रे आहेत, जी त्यांच्याकडील र्डी-३० विमानातून डागता येतील. भारताकडून ब्रह्मोस घेणारा फिलिपाईन्स, व्हिएतनाम नंतरचा इंडोनेशिया हा तिसरा देश आहे. ३) हैदराबाद येथील टेक मी टू स्पेस या स्टार्टअप ने बनवलेला पहिला स्वदेशी पॉवर पॅक-५०, स्काय रूट च्या विक्रम-१ या प्रक्षेपका मध्ये यशस्वीपणे वापरला गेला. आतापर्यंत ह्या महाग बॅटरी परदेशातून आयात कराव्या लागत होत्या.✻ ३८० ग्रॅम वजनाच्या या पॉवर पॅक मध्ये ५० थह एनर्जी साठवलेली आहे आणि हा सलग ५ वर्षे काम करणार आहे.

४) ३१ जुलै रोजी केंद्र सरकारच्या मंत्री परिषदेने ८४,०८४ कोटी रुपयांच्या पहिल्या टप्प्यातील समुद्रमंथन योजनेस मान्यता दिली. ही योजना २०३०-३१ पर्यंत असेल. भारताच्या मोठ्या समुद्रकिनाऱ्यावरील खोल व अतीखोल (म्हणजे ३,००० मीटर खोल) असलेल्या ठिकाणी ५६० कोटी टन (तेल व तत्सम) हायड्रोकार्बन असायची शक्यता आहे. सध्या भारत दरवर्षी १३ लाख कोटी रुपयांचे तेल आयात करतो. आणि या योजनेमुळे त्यात किमान १ लाख कोटी रुपयांची बचत होऊ शकते. तेल विहीर हा प्रकल्प अत्यंत खर्चिक आहे. साधारणपणे अशा विहिरीतून उत्पादन सुरू होण्यास ५ ते १० वर्षे लागतात. आणि एका विहिरीला १,५०० लाख डॉलर (१,४५० कोटी रुपये) खर्च येतो. त्यामुळे विहिरीचे ठिकाण अचूक असावे लागते. सरकारने यासाठी विहिरींच्या २डीआणि ३डी सर्वेक्षणासाठी २८,५३४ कोटी रुपये तर ६०० विहिरींच्या खुदाईसाठी ४३,२०० कोटी रुपयांची मदत मंजूर केली आहे.

**कुमार आठवले.**

**मो. : ९४२२००७५६२**

◈ ◈ ◈

# देवदूत - एक सॉफ्ट टारगेट

**मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम्।**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।**

डॉक्टर हा एकेकाळी देवदूत म्हणून अत्यंत श्रद्धेने, विश्वासाने आपल्या कुटुंबाचा एक भाग समजला गेला होता, आज त्याच्यावरच हात उगारून, हल्ले करून त्याला अगदी 'सहज लक्ष्य' (सॉफ्ट टारगेट) केले जात आहे, हे पाहून मन विषण्ण झाले आणि यावर विचार मंथन सुरू झाले.

सुरुवातीला लिहिलेल्या श्लोकातील धन्वंतरीच्या (विष्णूच्या) कृपेचा थोडासा अंश (प्रसाद) लाभलेला डॉक्टर नावाचा माणूस आज मात्र हतबल झालेला, खचून गेलेला दिसतो. समाजाची त्याच्यावरील श्रद्धा आणि विश्वास हा आजच्या युगात डळमळीत झालेला दिसतो आहे. सद्यस्थितीत डॉक्टरांवर वारंवार होणारे हल्ले, त्यांना दिला गेलेला त्रास आणि यांच्या दवाखान्याचे, रुग्णालयाचे केलेले नुकसान पहाता समाजातील वाढलेल्या गुंडगिरीमुळे आणि राजकारण्यांचे त्यांना समर्थन लाभल्यामुळे या आदर्श व्यवसायाला ग्रहण लागले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

थोडक्यात सांगायचे झाले **तर जिथे प्रतिकार करण्याची शक्ती कमी असते आणि भरपूर नुकसान पोचवता येते, त्याला 'सॉफ्ट टारगेट'** असे म्हणतात. आणि याचे सध्याच्या युगात सहज बळी ठरणारे डॉक्टर किंवा वैद्यकीय व्यावसायिक हेच होत.

खरेतर प्रत्येक डॉक्टर रुग्णाच्या चांगल्यासाठीच मनापासून शंभर टक्के प्रयत्न करीत असतो. आपला रुग्ण चांगला व्हावा त्याचे काही बरेवाईट होऊ नये हीच प्रत्येक डॉक्टरची उपचार करताना भावना असते. तो आपल्या चांगल्यासाठीच झटतो आहे हा ठाम विश्वास रुग्णाच्या आणि नातेवाईकांच्या मनामध्ये पूर्वी असावयाचा. **फॅमिली फिजिशियन** ही संकल्पना देखील समाजामध्ये रूढ होती आणि तो त्या कुटुंबाचा अविभाज्य घटक आणि तारणहार होता. परंतु कालांतराने परिस्थिती खूपच बदलली. सध्याच्या आधुनिक युगात डॉक्टरांवरील विश्वास उडाला, श्रद्धा लोप पावली आणि त्यांच्याकडे एक **लोभी, स्वार्थी व्यावसायिक या दृष्टीने** समाज पाहू लागलेला आहे.

याची पुढील पायरी म्हणजे रुग्णाचे काही बरे वाईट झाल्यास त्या डॉक्टरला दोषी ठरवून, धारेवर धरले जाऊन त्याच्यावर हल्ले करून रुग्णालयाची मोडतोड करणे, त्याचे बिल बुडवणे आणि अर्वाच्य भाषा वापरून सोशल मीडियावरून त्याची बदनामी करणे, डॉक्टरांची कूप्रसिद्धी करणारे व्हिडिओ दाखवणे, यातच काही व्यक्ती धन्यता मानू लागल्या. त्यांना राजकारण्यांचाही काही प्रमाणात पाठिंबा मिळत असल्यामुळे डॉक्टर किंवा वैद्यकीय व्यावसायिक यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही दूषित होऊ लागला आहे हे नक्की. जे डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले, हिंसेची कारणे ही एक अतिशय गंभीर, चिंताजनक, संवेदनशील समस्या बनली असून ती समाज आणि वैद्यकीय क्षेत्र या दोघांसाठीही अत्यंत घातक आहे. त्यात समाजातील सर्व नागरिकांचे खूप मोठे नुकसान होत आहे हे हल्ले करणाऱ्यांच्या अजूनही लक्षात कसे येत नाही याचे खूप मोठे आश्चर्य वाटते. अर्थात याला **अनेक कारणे** आहेत. म्हणून दोन्ही बाजूंकडून सांगोपांग विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

दोन्ही बाजूंचे नक्कीच कुठेतरी चुकते आहे हे लक्षात येते. त्यामुळे डॉक्टर रुग्णालयातील संवाद, एक मैत्रीचा धागा, नाते हरवत चालले आहे हे निश्चित.

**सर्वप्रथम आपण रूग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांचे काय चुकते, कुठे चुकते हे पाहू.**

अनेकदा गंभीर अपघातग्रस्त, आसन्नमरण अवस्थेतील रुग्णाचे नातेवाईक अत्यंत तणावग्रस्त मनस्थितीत असतात. डॉक्टरांनी सर्वतोपरी उपचार करूनसुद्धा त्यांचे प्रयत्न काहीवेळा तोकडे पडतात व रुग्ण दगावतो.

अशावेळी त्या रागाचा, दुःखाचा उद्रेक हा डॉक्टरला मारहाण करण्यात रुग्णालयाचे नुकसान करण्यात होतो. 'काही झाले तरी रूग्ण १००% बरा झालाच पाहिजे अशी त्यांची अपेक्षा

असते', आणि या **अवास्तव अपेक्षेमुळे** ते लोक वैद्यकीय शास्त्राच्या मर्यादा आणि रुग्णाला बरे करण्यासाठी डॉक्टरने पत्करलेले धोके ही समजून घेत नाहीत.

त्यात सोशल मिडिया वरील अर्धवट ज्ञानामुळे संशयित आणि आधीपासूनच कलुषित, अश्रद्ध झालेले त्यांचे मन प्रक्षुब्ध होते आणि डॉक्टरांवर हात उगारला जातो. त्यावेळी कोणतीच गोष्ट समजून न घेता, कायद्याचे भानही न ठेवता, दुःख आणि अक्रोशाच्या भरात डॉक्टरला जीवे मारण्याची धमकी देऊन दवाखान्याची मोडतोड केली जाते.

इतर रुग्णांना त्याचा त्रास होईल याचा विचारही न करता या हल्ल्यांमुळे निष्पाप डॉक्टर, रुग्ण वाचवण्याचे प्रयत्न करूनसुद्धा या लोकांची शिकार बनतो असे दिसून येते.

बऱ्याचदा डॉक्टर– रुग्ण व नातेवाईक यांच्यातील **'संवादाचा अभाव किंवा कम्युनिकेशन गॅप'** यासाठी कारणीभूत ठरू शकते. रुग्णाची गंभीर स्थिती, उपचाराचा खर्च, त्यासाठी लागणाऱ्या तपासण्या, आजारातील धोके कोणते होऊ शकतात याची पूर्ण कल्पना डॉक्टरने रुग्णास देणे अत्यंत गरजेचे आहे. तेथे काही डॉक्टर कमी पडतात हे निश्चित.

अत्यंत नम्रपणे व सहानुभूतीपूर्वक या सगळ्याची कल्पना रुग्ण व नातेवाईकांना देणे डॉक्टरांचे तसेच रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे. अनेकदा **कर्मचाऱ्यांच्या रूक्ष, उद्धट वागणुकीमुळे गैरसमज निर्माण होतात आणि वाढतात.**

तसेच बिलांच्या बाबतीत पारदर्शकता नसली तर नातेवाईकांच्या मनात **'लुटले जात असल्याची'** भावना निर्माण होते, म्हणून वेळप्रसंगी बिलात लवचिकता ठेवणे हे गरजेचे असते, हे डॉक्टरांनी कायम लक्षात ठेवले पाहिजे.

काही छोट्या रुग्णालयात किंवा सरकारी रुग्णालयात पायाभूत सुविधा नसतात, आयत्या वेळेला पेशंटला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यास सांगितले जाते. एका डॉक्टरला अनेक रुग्ण पहावे लागतात, अपुरी सुरक्षा व्यवस्था असते ही सर्व कारणे रूग्ण आणि नातेवाईकांची नाराजी ओढवून घेण्यास कारणीभूत ठरतात.

या सर्व गोष्टींमुळे **डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्याचे दुष्परिणाम** म्हणजे– **डॉक्टरांना असुरक्षित वाटणे** हे सगळ्यात महत्त्वाचं आहे.

**वैद्यकीय सेवेचा दर्जा घसरू लागला आहे.** भीती आणि असुरक्षिततेच्या वातावरणात गंभीर रुग्णांवर उपचार करण्यासाठी डॉक्टर धजावत नाहीत, त्यांच्यावर उपचार करण्याचे किंवा अति धोकादायक शस्त्रक्रिया करण्याचे टाळतात.

या सर्वातून बाहेर पडून पुन्हा समाजाचा विश्वास आणि श्रद्धा वाढवण्यासाठी **डॉक्टरांनी काय प्रयत्न केले पाहिजेत याचा विचार केला पाहिजे.** त्यासाठी माझ्या मते –

डॉक्टरांनी वैद्यकीय शिक्षणाबरोबरच रुग्ण व नातेवाईकांशी उत्तम संवाद कसा साधता येईल हे शिकले पाहिजे, **'संवाद कौशल्य किंवा कम्युनिकेशन स्किल वाढवले पाहिजे.'**

रुग्णाच्या परिस्थितीची पूर्ण कल्पना नातेवाईकांना दिली पाहिजे, उपचारामधील धोके, उपचार न केल्यास होणारे परिणाम व रुग्णाचे नुकसान, हॉस्पिटल मधील तपासण्यां च्या मर्यादा आणि असलेल्या मर्यादित सुविधा, पूर्ण खर्च, संभाव्य बिलाची कल्पना देऊन **व्यवहारात पारदर्शकता ठेवली पाहिजे.**

**कडक सुरक्षा व्यवस्था आणि कायदे** – अंमलबजावणीसाठी सी.सी. टीव्ही, सुरक्षा रक्षक असावेत आणि डॉक्टरांवर हल्ले केल्यास कायद्यानुसार काय शिक्षा होते याची रुग्णालयामध्ये नोटीस लावावी.

रुग्णांना सर्व माहिती समजावण्यासाठी एखादा **PRO (patient relation officer)** नेमावा.

**सरकारी रुग्णालये अद्यावत** करावीत आणि सरकारने हल्लेखोरांवर कडक कारवाई करण्यासाठी पावले उचलावीत. राजकारण्यांनी गुंडांना पाठीशी घालू नये.

तसेच रुग्णांनी व नातेवाईकांनी हे लक्षात ठेवावे की **'औषधे आजार बरा करतात पण डॉक्टरांवरचा विश्वास श्रद्धा आणि सहानुभूती आपणास पूर्णपणे निरोगी बनवते.'**

म्हणून शेवटी समाजाला एकच सांगणे आहे की, **ज्या प्रमाणे देवाचे मंदिर हे मनाला शांती देते त्याप्रमाणे डॉक्टरांचे हातच शरीराला जीवनदान देतात.**

म्हणून रुग्णांनी व नातेवाईकांनी कायम लक्षात ठेवावे की, **'आजारपणाच्या अंधारात आशेचा किरण म्हणजे डॉक्टर – एक देवदूत'**

**डॉक्टर संजीव नारायण दात्ये**
**कन्सल्टिंग जनरल सर्जन, चिंचवड पुणे**

◈ ◈ ◈

# व्रतांचा व सणांचा राजा श्रावण

श्रावण (sravana) महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे. आणि चातुर्मासातील पहिला आणि महत्त्वाचा महिना. या महिन्याची अनेक वैशिष्ट्ये सांगितली जातात. मुख्यत्वे करून शिवपूजनाला अनन्य साधारण महत्त्व आहे. श्रावण आणि शिवाचे महत्त्व भारतीय संस्कृती व परंपरांमध्ये विशेष आहे. अनेक गोष्टी या शिवमय झालेल्या दिसतात. आपले जीवन दुसऱ्यांसाठी समर्पित करणे हेच शिवदर्शन होय.

सुंदरता, मधुरता, नवचैतन्य, उत्साह आपल्या अंतर्मनात समाविष्ट करता आला, तर आजीवन कोणाबद्दलही आपण इर्ष्या बाळगणार नाही. या महिन्याची महती समजणे हे शिवाचे प्रतीक ओळखण्याइतके सोपे आहे. शिवाच्या प्राप्तीसाठी पार्वती देवीने या महिन्यातच कठोर तप केले होते. हे तप म्हणजे आपले प्रेम मिळवण्यासाठी केलेला संघर्ष होय. याचाच दुसरा अर्थ म्हणजे शिवप्राप्ती होण्यासाठी आपले मन धुतल्या तांदळासारखे स्वच्छ, निखळ आणि पारदर्शक असणे आवश्यक मानले जाते. षडविकार, दुर्गुण याचा त्याग करून प्रामाणिकपणे, निष्ठेने, अत्यंत श्रद्धा भावनेने, त्याग आणि समर्पित वृत्तीने शिवाची आराधना, उपासना, नामस्मरण करणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

पार्वती देवीप्रमाणे आपले हृदय पवित्र, निर्मळ असले पाहिजे. असे मन घडवण्यासाठी कठोर साधना हाच उत्तम मार्ग आहे. या महिन्यात तप करणे अत्यंत उपयुक्त मानले गेले आहे. कारण हा सृष्टीच्या सृजनोत्सवाचा काळ मानला गेला आहे. यामध्ये पावसाच्या दोन कजोदार सरींच्या दरम्यान चक्क ऊन्ह पडते. दिवसभर हा ऊन-पावसाचा खेळ चालू असतो. श्रावणाचे ऊन नेहमीच कोवळे असते. ते ज्याला सोसत नाही ती व्यक्ती खरोखरच नाजूक असली पाहिजे.

या महिन्याला सर्व व्रतांचा/सणांचा राजा म्हटले जाते. या महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची हिंदू आणि जैनधर्मीयांची परंपरा आहे.

**या महिन्यातील व्रते** : व्रत म्हणजे व्रतवैकल्ये! वैकल्यांचा अर्थ विकलता ! म्हणजे बारीक होणे. स्वार्थ व परमार्थ साधणारे हे व्रत आहे.

**सोमवार –** शंकराची पूजा व उपासना करण्याची पद्धत आहे. नवविवाहित वधू लग्नानंतर पाच वर्षेपर्यंत दर सोमवारी शिवामूठ वाहतात. मूठभर तांदूळ व तीळ, मूग, जवस, व सातूची शिवामूठ एकेका सोमवारी एकेक याप्रमाणे शिवाला वाहतात.

**मंगळवार –** नवविवाहित स्त्रिया दर मंगळवारी शिव मंगळागौरीची पूजा करतात. पहिली पाच वर्षे मंगळागौर केल्यानंतर, नंतरच्या एखाद्या वर्षी उद्यापन करतात.

**बुधवार –** बुधाची पूजा

**गुरुवार –** बृहस्पती पूजा

**शुक्रवार –** जिवती देवीचे पूजन, पुरणाच्या दिव्यांनी अपत्यांना ओवाळणे आणि हळदी-कुंकू करण्याचीही प्रथा आहे.

**शनिवार –** ब्रह्मचारी किंवा ब्राह्मण यांचे पूजन

**रविवार –** आदित्य राणूबाई पूजन

**सत्यनारायण पूजा –** या महिन्यात सत्यनारायण पूजा करण्याची पद्धती महाराष्ट्रात प्रचलित झाली आहे.

**दान –** हा महिना चातुर्मासातील श्रेष्ठ महिना मानला जात असल्याने कित्येक धनिक लोक प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत ब्राह्मणांना व गोरगरिबांना भोजन देतात. देवस्थानांतही या महिन्यात कथापुराणादी कार्यक्रम ठेवतात.

या महिन्यातील सण शुद्ध पंचमी- नागपंचमी

पौर्णिमा – रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा

वद्य अष्टमी- श्रीकृष्ण जयंती/'कृष्ण जन्माष्टमी'

पिठोरी अमावास्या/दर्भग्रहणी अमावास्या- पोळा

**संत साहित्य वरून साभार**

# रिंगच्या बाहेरही देशासाठी लढली लव्हलीना!

**ग्लासगोतील भारताच्या चुकीच्या नकाशावर घेतलेली भूमिका आणि पंतप्रधान मोदींकडून झालेलं कौतुक**

खेळाच्या मैदानात पदकासाठी लढणारे खेळाडू आपण नेहमी पाहतो. प्रतिस्पर्ध्याला पराभूत करून तिरंगा उंचावणारा खेळाडू म्हणजे देशाचा अभिमान, हेही आपण मानतो. मात्र काही प्रसंग असे असतात, जे खेळाच्या मैदानाच्या बाहेर घडतात आणि तरीही त्या खेळाडूच्या देशप्रेमाची खरी ओळख करून देतात.

राष्ट्रकुल स्पर्धा २०२६ दरम्यान भारतीय बॉक्सर लव्हलीना बोरगोहेन यांच्या बाबतीत असाच एक प्रसंग घडला. ग्लासगो येथील एका रेस्टॉरंटमध्ये भारताचा चुकीचा नकाशा पाहिल्यानंतर त्यांनी त्यावर शांतपणे, पण ठामपणे आक्षेप घेतला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेत आला आणि नंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः लव्हलीनाशी संवाद साधताना या प्रसंगाचा उल्लेख करून तिचे विशेष कौतुक केले.

पदकाच्या आनंदातही देशाचा नकाशा नजरेतून सुटला नाही. राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय बॉक्सिंग संघाने उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर भारतीय बॉक्सिंग संघाच्या सदस्यांसाठी ग्लासगोतील Mister Singh's India या रेस्टॉरंटमध्ये डिनरचे आयोजन करण्यात आले होते.

आनंदाचा, विजयाचा आणि सेलिब्रेशनचा तो क्षण होता. परंतु लव्हलीनाच्या नजरेस रेस्टॉरंटच्या मेन्यूवरील भारताचा नकाशा पडला. त्या नकाशामध्ये ईशान्य भारताचा भाग दाखवण्यात आलेला नव्हता. रेस्टॉरंटच्या बाहेरील चिन्हावरही अशाच प्रकारचे चुकीचे चित्रण असल्याचे वृत्त आहे.

असमची असल्यामुळे ईशान्य भारताशी तिचे भावनिक नाते अधिक घट्ट आहे. त्यामुळे हा नकाशा पाहून तिला ते खटकले. मात्र तिने आक्रमकपणे किंवा अपमानास्पद पद्धतीने प्रतिक्रिया दिली नाही.

तिने रेस्टॉरंट व्यवस्थापनाला समजावून सांगितले की भारताच्या नकाशामध्ये ईशान्य भारताचा भाग नसणे ही बाब तिच्यासाठी वेदनादायक आहे आणि भविष्यात याची काळजी घेतली जावी.

**देशप्रेम म्हणजे केवळ राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहणे नाही**

लव्हलीनाच्या या कृतीचा सर्वात महत्त्वाचा संदेश इथेच आहे. देशप्रेम म्हणजे केवळ १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारीला तिरंगा फडकवणे नाही. देशप्रेम म्हणजे देशाच्या प्रत्येक भागाशी असलेले भावनिक नाते जपणे.

भारताच्या नकाशात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून ईशान्य भारतापर्यंत प्रत्येक प्रदेशाचा समान वाटा आहे. ईशान्य भारताचा भाग चुकीच्या पद्धतीने दाखवला गेला, तर त्याकडे दुर्लक्ष न करता त्याबद्दल प्रश्न विचारणे ही राष्ट्रीय सजगतेचीच भावना आहे.

विशेषतः परदेशात असताना एखाद्या भारतीयाने देशाच्या नकाशातील त्रुटीकडे लक्ष वेधणे ही गोष्ट अधिक अर्थपूर्ण ठरते.

लव्हलीनाने वाद घातला नाही; तिने भूमिका मांडली. या घटनेतील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे लव्हलीनाने केलेली प्रतिक्रिया.

तिने रेस्टॉरंटच्या कर्मचाऱ्यांशी उद्धटपणे वर्तन केले नाही. उपलब्ध व्हिडिओ आणि वृत्तांनुसार तिने शांतपणे आपली नाराजी

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

व्यक्त केली आणि सांगितले की ईशान्य भारताचा भाग गायब असल्याचे पाहून तिला दुःख झाले.

म्हणजेच ठाम भूमिका आणि सभ्य संवाद यांचा सुंदर समन्वय या प्रसंगात दिसून आला. हीच गोष्ट या घटनेला अधिक महत्त्व देते.

### रेस्टॉरंटने मागितली माफी

लव्हलीनाच्या आक्षेपानंतर हा विषय सोशल मीडियावर चर्चेत आला. त्यानंतर रेस्टॉरंट व्यवस्थापनाने चुकीच्या नकाशाबद्दल माफी मागितली आणि योग्य भारताचा नकाशा वापरण्याची भूमिका घेतली. भारतीय अधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची दखल घेतल्याचे वृत्त आहे. म्हणजे लव्हलीनाने केवळ नाराजी व्यक्त केली नाही, तर तिच्या प्रश्नामुळे चुकीचे चित्रण दुरुस्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

### पंतप्रधान मोदींनी स्वतः केला उल्लेख

या घटनेला विशेष महत्त्व मिळाले ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिक्रियेमुळे. राष्ट्रकुल स्पर्धेतून परतलेल्या भारतीय खेळाडूंची भेट घेताना मोदी यांनी लव्हलीनाला या घटनेची आठवण करून दिली. हलक्या–फुलक्या शैलीत त्यांनी रेस्टॉरंटमधील प्रसंगाचा उल्लेख केला आणि लव्हलीनाशी संवाद साधला. लव्हलीनाने त्यांना संपूर्ण प्रसंग सांगितल्यानंतर पंतप्रधानांनी तिच्या कृतीचे कौतुक केले.

त्यांनी विशेषतः अधोरेखित केले की विजयाच्या आनंदात आणि सेलिब्रेशनच्या वातावरणातही भारताच्या नकाशाचे महत्त्व तिच्या लक्षात आले, ही साधी गोष्ट नाही.

पंतप्रधानांनी या घटनेचा व्हिडिओ साधारण नव्हता आणि लोक तो दीर्घकाळ लक्षात ठेवतील, अशा आशयाचे उद्गार काढले.

### रिंगमध्ये पदक, रिंगच्या बाहेर देशाचा सन्मान

लव्हलीनासाठी राष्ट्रकुल स्पर्धा स्वतःमध्येच यशस्वी ठरली. तिने महिलांच्या ७५ किलो वजनी गटात रौप्यपदक मिळवले. परंतु तिच्या या कामगिरीबरोबरच ग्लासगोतील नकाशाचा प्रसंगही तिच्या राष्ट्रभावनेचे उदाहरण म्हणून समोर आला.

एकीकडे ती बॉक्सिंगच्या रिंगमध्ये भारतासाठी लढत होती. दुसरीकडे, रिंगच्या बाहेर भारताच्या नकाशाबद्दल आवाज उठवत होती. हीच या घटनेची खरी ताकद आहे.

पदक मिळवणे हे तिच्या क्रीडा कौशल्याचे प्रतीक आहे; पण देशाच्या नकाशाबद्दल संवेदनशीलता दाखवणे हे तिच्या राष्ट्रीय जाणीवेचे प्रतीक आहे.

### ईशान्य भारतासाठीही हा प्रसंग महत्त्वाचा

भारताच्या मुख्य प्रवाहात ईशान्य भारताचा उल्लेख अनेकदा केवळ भौगोलिक प्रदेश म्हणून केला जातो. पण लव्हलीनाची प्रतिक्रिया सांगते की ईशान्य भारतातील नागरिकांसाठी हा प्रदेश त्यांच्या ओळखीचा, अभिमानाचा आणि भारताशी असलेल्या नात्याचा अविभाज्य भाग आहे.

नकाशातून आमचा भाग गायब आहे ही केवळ भौगोलिक चूक नसून, त्या प्रदेशातील व्यक्तीच्या भावनांना स्पर्श करणारी बाब असू शकते.

म्हणूनच लव्हलीनाने हा मुद्दा उपस्थित केला, हे केवळ स्वतःच्या भावनेपुरते मर्यादित राहिले नाही. त्यातून ईशान्य भारताच्या समावेशकतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेशही गेला. लव्हलीनाच्या कृतीतून तीन मोठे संदेश या संपूर्ण घटनेतून तीन महत्त्वाचे संदेश मिळतात.

पहिला – देशप्रेमाला सीमा नसतात.

आपण भारतात असो किंवा परदेशात, आपल्या देशाबद्दलची जाणीव आणि अभिमान कायम राहू शकतो.

दुसरा – विरोध करण्याची पद्धतही महत्त्वाची असते.

लव्हलीनाने आक्षेप घेतला; पण तो सभ्यपणे आणि समजावून सांगण्याच्या पद्धतीने घेतला.

तिसरा – भारत म्हणजे प्रत्येक राज्य आणि प्रत्येक प्रदेश.


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

ईशान्य भारत असो, जम्मू–काश्मीर असो, दक्षिण भारत असो किंवा पश्चिम भारत–भारताच्या प्रत्येक भागाचे स्थान समान महत्त्वाचे आहे.

**पदकापेक्षा मोठा संदेश**

लव्हलीना बोरगोहेन राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक जिंकून भारतात परतली. तिच्या हातात पदक होते. पण ग्लासगोतील तिच्या एका छोट्याशा कृतीने तिला आणखी एक वेगळी ओळख मिळवून दिली–देशाच्या नकाशाबद्दल जागरूक असलेली आणि आपल्या देशाच्या अखंडतेबद्दल संवेदनशील असलेली खेळाडू. पंतप्रधान मोदींनी तिच्या या कृतीचे केलेले कौतुक त्यामुळेच महत्त्वाचे ठरते.

खेळाडू मैदानात देशासाठी खेळतात, पदके जिंकतात आणि तिरंगा उंचावतात. पण कधी कधी मैदानाबाहेरचा एखादा छोटासा प्रसंग त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी मोठी ओळख करून देतो. लव्हलीनाचा ग्लासगोतील प्रसंग असाच आहे.

रिंगमध्ये तिने प्रतिस्पर्ध्याशी सामना केला; रिंगच्या बाहेर तिने भारताच्या चुकीच्या नकाशाला प्रश्न विचारला. आणि म्हणूनच तिची ही कृती केवळ एका रेस्टॉरंटमधील नकाशाचा वाद न राहता–देशासाठी लढणे म्हणजे नेहमी हातात ग्लोव्हज असणे आवश्यक नाही.

कधी कधी देशासाठीची लढाई एका साध्या प्रश्नातूनही सुरू होते–भारताच्या नकाशात आमचा भाग कुठे आहे?

हीच लव्हलीनाच्या कृतीची खरी ताकद आहे.

**जयंत केसकर, रमणबाग**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख १

**स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं**
**बल्लाळं मुरुडं विनायकं मढं चिन्तामणीस्थेवरम् ।**
**लेण्याद्रिं गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरं**
**ग्रामे रांजणसंस्थितं गणपतिः कुर्यात् सदा मङ्गलम् ।।**

बुद्धी आणि कलेची देवता मानल्या गेलेल्या श्री गणेशाचे हे स्तोत्र अष्टविनायक स्तोत्र किंवा मंत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

महाराष्ट्रामध्ये अष्टविनायक यात्रेला एक वेगळेच महत्व आहे. याच अष्टविनायकांबद्दल आज आपण माहिती घेणार आहोत.

उपरोक्त स्तोत्रामधील अष्टविनायकाचा क्रम आणि सध्या रूढ असणाऱ्या अष्टविनायक यात्रेचा क्रम काहीसा वेगळा आहे, तथापि आपण उपरोक्त क्रमाचा विचार करून, अष्टविनायकांची माहिती घेऊयात.

**पहिला गणपती : मोरगावचा मोरेश्वर**

अष्टविनायकातील सर्वांत पहिला गणपती म्हणून मोरगावचा मयूरेश्वर ओळखला जातो.

एका आख्यायिके नुसार असे मानले जाते की, पूर्वी सिंधू नावाच्या असुराने पृथ्वीतलावर उत्पात माजवला होता, त्याचा नाश करण्यासाठी देवांनी अखेर गणपतीची आराधना केली, तेव्हा गणपतीने मयूरावर आरूढ होऊन येथे सिंधू असुराचा वध केला. त्यामुळे गणपतीला येथे मयूरेश्वर असे नाव पडले. या गावात मोरांची संख्या जास्त असल्यामुळे त्याला मोरगाव असे म्हणतात.

मयुरेश्वराची मूर्ती गर्भगृहात स्थित आहे, जिथे केवळ मुख्य पुजाऱ्यालाच प्रवेश असतो. ही मूर्ती पूर्वाभिमुख आहे. गाभाऱ्यातील मयूरेश्वराची मूर्ती बैठी, डाव्या सोंडेची, पूर्वाभिमुख आणि अत्यंत आकर्षक आहे.

मूर्तीच्या डोळ्यात व बेंबीत हिरे बसवले आहेत. मस्तकावर नागराजाचा फणा आहे. मूर्तीच्या डाव्या– उजव्या बाजूस रिद्धि–सिद्धीच्या पितळी मूर्ती असून पुढे मूषक व मयूर विराजमान आहेत.

या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मंदिराच्या समोर एक नंदीची मूर्ती आहे. असे सांगितले जाते की शंकराच्या मंदिरासाठी नंदीची मूर्ती एका रथातून नेली जात होती, मात्र येथे आल्यावर त्या रथाचे चाक तुटले. त्यामुळे या नंदीला येथेच ठेवण्यात आले.

श्री मयुरेश्वर मंदिर, मोरगाव सदर मंदिर, पायदळ प्रमुख सरनौबत नरवीर पिलाजी गोळे यांचे आजोबा सुभेदार गोळे यांनी बांधले आहे.

मोरेश्वराचे मंदिर काळ्या दगडापासून तयार करण्यात आले असून प्रशस्त आणि भक्कम आहे. बहामनी काळात हे मंदिर बांधले गेले आहे. गावाच्या मध्यभागी असलेल्या या देवळाला चारही बाजूंनी मनोरे आहेत. मंदिराच्या बाजूने ५० फूट उंचीची संरक्षण भिंत आहे.

गाणपत्य संप्रदायातील चिंचवडच्या श्री मोरया गोसावी यांची श्री मयूरेश्वरावर नितांत श्रद्धा होती असे मानले जाते.

मंदिराच्या परिसरात शमी, मंदार आणि तरटी यांसारखी काही पवित्र वृक्ष आहेत. यांपैकी शमीचे झाड विशेष महत्त्वाचे मानले जाते. श्री मोरया गोसावी ऋषींनी याच झाडाखाली तपश्चर्या केली होती आणि त्यांना भगवान गणेशाचे दर्शन झाले होते अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे.

त्यामुळे, या झाडाखाली तपश्चर्या केल्यास भक्ताच्या इच्छा पूर्ण होतात, अशी श्रद्धा आहे. सध्या हे मंदिर चिंचवड देवस्थान ट्रस्ट यांच्या अंतर्गत असून, त्याद्वारे मंदिराचा कारभार चालवला जातो.

मोरगांव चे हे मंदिर, पुणे रेल्वे स्थानक पासून हडपसर–सासवड आणि जेजुरीमार्गे ६४ कि.मी. वर आहे. तसेच पुणे–सोलापूर मार्गावर पुण्यापासून ५५ कि.मी. वर चौफुला गाव आहे. तेथून मोरगावला जाता येते. चौफुला ते मोरगाव अंतर २३ कि.मी. आहे.

**संकलन – शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख २

**सिद्धी देणारा, सिद्धटेकचा सिद्धिविनायक.**

अहिल्यानगर जिल्हातील, सिद्धटेक येथे अष्टविनायकातील दुसरा गणपती स्थित आहे. या गणपतीला सिद्धिविनायक असे म्हटले जाते.

आख्यायिकेनुसार हा गणपती असलेली संपूर्ण टेकडीच दैवी शक्तीने प्रभावित असून तिच्या सलग २१ दिवस २१ प्रदक्षिणा केल्यास जीवनात अर्धवट राहिलेली, विघ्न बाधित कार्ये सिद्धीस म्हणजे पूर्णत्वास जातात. यासाठी सिद्धटेकची ख्याती आहे.

सिद्धिविनायक गणेशाच्या मूर्तीची सोंड उजवीकडे वळलेली आहे. हे एकमेव असे अष्टविनायक मंदिर आहे जिथे देवतेची सोंड उजवीकडे आहे. परंपरेने, ज्याची सोंड उजवीकडे आहे त्या गणपतीस सिद्धी-विनायक असे संबोधले जाते. मंदिरातील सिद्धिविनायकाची मूर्ती स्वयंभू असून ती तीन फूट उंच व अडीच फूट रुंद आहे. आहे. मूर्तीचे तोंड उत्तरेकडे असून ती गजमुखी आहे. सोंड उजवीकडे असल्याने सोवळे कडक आहे. त्यामुळे हा गणपती भक्तांसाठी कडक मानला जातो. गणपतीने एक मांडी घातली असून त्यावर ऋद्धि-सिद्धी बसलेल्या आहेत. प्रभावळीवर चंद्र, सूर्य, गरुड यांच्या आकृत्या असून मध्यभागी नागराज आहे. या मंदिराला एक प्रदक्षिणा घालायची म्हणजे साधारण १ किलोमीटर चालावे लागते.

मुद्गल पुराणानुसार, मधू आणि कैटभ या राक्षसांचा संहार करण्यासाठी भगवान विष्णूंनी श्री गणेशाची आराधना केली होती.

भगवान विष्णूंवर प्रसन्न होऊन, श्री गणरायांनी विष्णूला आशीर्वाद आणि विविध सिद्धी (शक्ती) प्राप्त करून दिली. याच सिद्धीच्या बळाने भगवान विष्णूंनी  दोन्ही राक्षसांचा संहार केला. भगवान विष्णूनी ज्या ठिकाणी सिद्धि घेतली ती जागा सिद्धटेक म्हणून ओळखली जाते. आणि सिद्धी देणारा म्हणून हा सिद्धिविनायक. याच क्षेत्रात संत मोरया गोसावी यांनीही सिद्धी प्राप्त केली होती.

पेशवेकालीन महत्त्व असलेल्या ह्या सिद्धिविनायकाच्या मंदिराचा गाभारा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधला. देवाचे मखर पितळेचे असून सिंहासन पाषाणाचे आहे. छोट्या टेकडीवर असलेल्या या देवळाचा रस्ता पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके यांनी तयार केला. मात्र, १५ फूट उंचीचे व १० फूट लांबीचे हे देऊळ अहिल्याबाई होळकर यांनी बांधले.

हरिपंत फडके यांचे सरदारपद पेशव्यांनी काढून घेतले, तेव्हा फडक्यांनी या मंदिरास २१ प्रदक्षिणा घातल्या. त्यानंतर २१ दिवसांनी त्यांची सरदारकी त्यांना परत मिळाल्याची आख्यायिका सांगितली जाते.

श्री क्षेत्र सिद्धटेक अहमदनगर जिल्ह्यात कर्जत तालुक्यात भीमा नदीच्या काठावर वसलेले एक गाव आहे. सिद्धटेकला जाण्यासाठी यात्रेकरूंना सोयीचे रेल्वे स्थानक म्हणजे दौंड. दौंड ते सिद्धटेक हे अंतर १८ कि.मी. आहे. दौंडवरून शिरापूर येथे बसने जाऊन पुढे नदी ओलांडून जावे लागते. नदीवर होड्या चालू असतात. आता मात्र नदीवर पूल झाला असल्याने होडीने जावे लागत नाही. गाड्या थेट मंदिरापर्यंत जातात.

दौंड-काष्टी-पेडगावमार्गे सिद्धटेक या ४८ कि.मी. लांबीच्या मार्गानेसुद्धा जाता येते. पुण्याहून हडपसर-लोणी-यवत-चौफुला-पाटस-दौंडमार्गे सिद्धटेक ९८ कि.मी. वर आहे.

**संकलन - शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख ३

**भक्ताच्या हाकेला धावून येणारा, पाली गावचा श्री बल्लाळेश्वर.**

आपल्या भक्ताच्या नावाने (बल्लाळ) प्रसिद्ध असलेला गणपती म्हणजेच रायगड जिल्हातील पालीगावचा श्री बल्लाळेश्वर!

अष्टविनायकातील तिसरा गणपती म्हणजेच श्री बल्लाळेश्वर. मुद्गल पुराणात उल्लेख असणाऱ्या कथे प्रमाणे, फार प्राचीन काळी, म्हणजे कृतयुगात सिंधू देशातील कोकण पल्लीर नावाच्या गावात (पाली गावात) कल्याण नावाचा एक व्यापारी राहात होता. त्याच्या पत्नीचे नाव इंदुमती. काही दिवसांनी त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव बल्लाळ. बल्लाळ जसजसा मोठा होऊ लागला, तसतसा त्याचा गणेश मूर्तिपूजनाकडे अधिक ओढा दिसू लागला. हळूहळू तो गणेश चिंतनात रमू लागला. त्याच्या मित्रांनाही गणेश भक्तीचे वेड लागले. बल्लाळ आपल्या मित्रांसह रानात जाऊन गणेश मूर्तीचे भजन–पूजन करू लागला. बल्लाळाच्या संगतीने मुले बिघडली अशी ओरड गावात सुरू झाली. लोक कल्याण शेठ्जीकडे जाऊन 'बल्लाळने आमच्या मुलांना बिघडविले' अशी तक्रार करू लागले.

आपला मुलगा इतक्या लहान वयात भक्तिमार्गाला लागला आणि त्याने आपल्याबरोबर इतर मुलांनाही वाईट नादाला लावले या विचाराने कल्याण शेठजींना राग आला. त्या रागाच्या भरातच तो बल्लाळ ज्या रानात होता तेथे गेला. तेथे बल्लाळ आपल्या सवंगड्यांसह एका पाषाणास श्री गणेश मानून पूजा करीत होता. ते पाहून कल्याण शेठजींच्या पायाची आग मस्तकाला गेली. त्याने ती पूजा मोडून टाकत गणेशाची मूर्ती फेकून दिली.

कल्याण शेठजीने बल्लाळास सोट्याने झोडपून काढले. बल्लाळास एका झाडाला वेलींनी बांधून ठेवले. कल्याण शेठ रागाने म्हणाला, 'येऊ दे तुझा गणेश आता तुला सोडवायला. घरी आलास तर ठार मारीन.' असे म्हणून कल्याण शेठ निघून गेला.

थोड्या वेळाने बल्लाळ भानावर आला. त्याचे शरीर ठणकत होते. तशाच स्थितीत त्याने गणेशाचा धावा केला. 'हे देवा, तू विघ्ननाशक आहेस. तू आपल्या भक्ताची कधीही उपेक्षा करीत नाहीस माझ्या संकटाचे हरण कर अन्यथा तुझे चिंतन करीतच मी देहत्याग करीन.'

बल्लाळाचा धावा ऐकून विनायक–गणेश ब्राह्मण रूपात प्रगट झाले. त्यांनी बल्लाळाचे बंध तोडले आणि म्हणाले, तुझ्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे. तू माझ्या भक्तीचा प्रवर्तक, श्रेष्ठ आचार्य व दीर्घायुषी होशील. आता तुला हवा तो वर माग.

तेव्हा बल्लाळ म्हणाला – 'तू याच ठिकाणी कायमचे वास्तव्य करावेस व आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण कराव्यात. ही भूमी गणेश क्षेत्र म्हणून प्रसिद्ध व्हावी.'

तेव्हा गणेश म्हणाले 'तुझ्या इच्छेनुसार मी इथे मबल्लाळ विनायकफ या नावाने कायमचे वास्तव्य करीन. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला जे भक्त येथे येतील त्यांच्या सर्व मनःकामना पूर्ण होतील.' असा वर देऊन गणेश जवळ असलेल्या एका शिळेत अंतर्धान पावले. तीच शिळा आज बल्लाळेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे.

पूर्वी हे मंदिर लाकडी असल्याचे सांगितले जाते आणि पुढे जाऊन नाना फडणीस यांनी या लाकडी मंदिराचे दगडी मंदिरात रूपांतर केले. या मंदिराची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे, जेव्हा सूर्य उगवतो तेव्हा त्याची किरणे मूर्तीच्या अंगावर पडतात. या मंदिराच्या दोन्ही बाजूस दोन तलाव आहेत. त्यातील एकाचे पाणी रोजच्या पूजेसाठी वापरले जाते. स्वयंभू असलेल्या या मूर्तीचे डोळे हिऱ्यांपासून बनवले आहेत, गणपतीच्या अंगावर उपरणे व अंगरखा अशी वस्त्रे आहेत.

पुण्यापासून बल्लाळेश्वर ११० किलोमीटरवर आहे. पुणे–लोणावळा –खोपोली मार्गे बल्लाळेश्वरला जाता येते.

**संकलन – शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख ४

**इच्छित वर देणारा महड गावचा श्री वरदविनायक.**

अष्टविनायकांपैकी चौथे आणि अत्यंत जागृत, फलदायी स्थान म्हणजे रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील महडचा श्री वरदविनायक!

'वरदविनायक' या नावाचा अर्थच मुळी मभक्तांच्या मनोकामना पूर्ण करून त्यांना इच्छित वर देणारा गणपतीफअसा आहे.

सुंदर निसर्गाच्या कुशीत विसालेले हे मंदिर कोट्यवधी भाविकांचे अश्रद्धा दूर करून मनात भक्तीचा प्रकाश देणारे पावन तीर्थक्षेत्र आहे.

या क्षेत्राचे महात्म्य प्राचीन काळापासून अगाध आहे. ऋग्वेदातील थोर ऋषी गृत्समद यांनी या तत्कालीन मपुष्पकफ (भद्रक) वनात विनायकाची कठोर आणि उग्र तपश्चर्या केली होती. त्यांच्या निर्मळ भक्तीवर प्रसन्न होऊन प्रत्यक्ष श्रीगणेशाने त्यांना दर्शन दिले व वरदान दिले. ऋषींच्या विनंतीवरून, आपल्या भक्तांचे कल्याण करण्यासाठी प्रभु विनायक येथेच स्थानापन्न झाले. ऋषींना वर प्राप्त झाला, म्हणून या रूपाला मवरदविनायकफ हे नाव प्राप्त झाले.

वरद विनायकाची स्वयंभू मूर्ती इ.स. १६९० मध्ये धोंडू पौडकर यांना मंदिराच्या मागील तलावात सापडली. पुढे इ.स. १७२५ मध्ये कल्याणचे सुभेदार रामजी महादेव भिवळकर यांनी या स्थानाचा महिमा ओळखून येथे भव्य मंदिराची उभारणी केली.

महडचे हे मंदिर अत्यंत प्रासादिक, शांत आणि निसर्गरम्य वातावरणात वसलेले आहे: मंदिराच्या निसर्गरम्य आवारात एक सुंदर तलाव असून त्याच्या शांत पाण्यामध्ये मंदिराचे प्रतिबिंब अतिशय मनमोहक दिसते. मंदिराचे बांधकाम पारंपरिक हेमाडपंथी शैलीतील आहे. मंदिराच्या चारही कोपऱ्यांवर कोरलेले भव्य दगडी हत्ती मंदिराच्या वैभवात भर घालतात. मंदिरावर २५ फूट उंचीचा विलोभनीय कळस असून त्यावर सोन्याचे चमकदार शिखर आहे, जे दुरूनच भक्तांचे लक्ष वेधून घेते.

मंदिरामध्ये प्रवेश करताच एका भव्य सभामंडपाचे दर्शन होते. सभामंडपाच्या टप्प्यातून पुढे गेल्यावर दगडी काम केलेला अतिशय पावन असा गाभारा लागतो. गाभाऱ्याची रचना अशी आहे की, श्रींच्या मूर्तीचे दर्शन मनाला प्रसन्नता देऊन जाते.

गाभाऱ्यामध्ये दगडी सिंहासनावर श्री वरदविनायकाची स्वयंभू, पूर्वाभिमुख आणि डाव्या सोंडेची मूर्ती विराजमान आहे. मूर्तीच्या डोळ्यात हिरे आणि नाभीत रिद्धी–सिद्धीचे प्रतीक मानले जाणारे अप्रतिम रत्नजडित काम केलेले आहे. मूर्तीचे रूप इतके तेजस्वी आहे की पाहताच भक्तांचा सर्व क्षीण नाहीसा होतो.

मंदिराच्या गाभाऱ्यात एक अलौकिक आणि अत्यंत पवित्र नंदादीप सतत प्रज्वलित असतो. इ.स. १८९२ पासून, म्हणजे तब्बल १३० हून अधिक वर्षांपासून हा दिवा अविरत तेवत आहे असे मानले जाते. हा नंदादीप भक्तीच्या अखंड ज्योतीचे प्रतीक मानला जातो.

या पुण्यक्षेत्राचे अलौकिक महत्व म्हणजे, अष्टविनायकांपैकी केवळ याच मंदिरात भाविकांना प्रत्यक्ष गाभाऱ्यात प्रवेश करून वरदविनायकाच्या मूर्तीचे दर्शन घेता येते, चरणस्पर्श आणि पूजा–अभिषेक सेवा करता येतो.

मुंबई–पुणे जुन्या महामार्गावरून (NH-4) खोपोलीजवळ महड फाटा लागतो. मुंबईपासून साधारण ८३ किमी तर पुण्यापासून सुमारे ८० किमी अंतरावर हे क्षेत्र स्थित आहे. जवळचे रेल्वे स्थानक 'कर्जत' किंवा 'खोपोली' आहे. तिथून मंदिरासाठी सतत बस, टॅक्सी आणि रिक्षा सेवा उपलब्ध असते.

**संकलन – शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख ५

**थेऊरगावाचा चिंतामणी**

अष्टविनायकातील पाचवा गणपती म्हणजे पुणे जिल्ह्यातील थेऊर येथील चिंतामणी हा होय.

ब्रम्हदेवाने आपले चित्त स्थिर करण्यासाठी गणपतीची या जागी आराधना केली. त्यामुळे या गावाला थेऊर असे नाव पडले, अशी अख्यायिका आहे. यासंदर्भात आणखी एक कथा आहे. राजा अभिजीत व राणी गुणवतीचा मुलगा गुणाने कपिलमुनींकडे असलेला चिंतामणी हे रत्न चोरले. कपिलमुनींना हे कळले तेव्हा त्यांनी गणपतीला ते रत्न गुणाकडून परत आणण्याची विनंती केली.

गणपतीने गुणाचा वध करून ते रत्न कपिलमुनींना दिले. मात्र, कपिलमुनींनी हे रत्न गणपतीला अर्पण केले. गणपतीच्या गळ्यात त्यांनी ते घातले व त्यांची चिंताही दूर झाली. त्यामुळे गणपतीला येथे चिंतामणी या नावाने ओळखले जाऊ लागले.

थेऊर हे गाव मुळा, मुठा आणि भीमा या तीन प्रमुख नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. मंदिराचे प्रवेशद्वार उत्तरेकडे आहे. मंदिराच्या मागील बाजूस एक सरोवर आहे त्याला 'कदंबतीर्थ' असे म्हटले जाते.

श्री चिंतामणीचे मंदिर भव्य असून मंदिराच्या आवारात एक मोठी घंटा आहे. मंदिरातील मूर्ती स्वयंभू असून डाव्या सोंडेची, आसन घातलेली व पूर्वाभिमुख आहे. त्याच्या दोन्ही डोळ्यात लाल मणी व हिरे आहेत. हे मंदिर आजही मजबूत स्थितीत आहे.

श्री मोरया गोसावी यांना येथेच सिद्धी प्राप्त झाल्याचेही सांगितले जाते. गणपतीचे मंदिर श्री मोरया गोसावी महाराज यांना थेऊर हे गाव इनाम असून सदर मंदिराची पुनर्बांधणी श्रीमोरया यांचे नातू श्री धरणीधर महाराज देव यांनी बांधले.

पुढे १०० वर्षांनंतर पेशव्यांनी तेथे भव्य व आकर्षक मंदिर व सभागृह बांधले. हे मंदिर पूर्णपणे लाकडापासून बनवले आहे. त्याकाळी हे मंदिर बांधायला ४० हजार रुपये लागले होते. युरोपीयांकडून पेशव्यांना पितळाच्या दोन मोठ्या घंटा मिळाल्या होत्या. त्यातील एक महाडला असून दुसरी येथे आहे.

वयाच्या २७व्या वर्षी श्रीमंत माधवराव पेशव्यांना क्षयरोग झाला. तेव्हा त्यांना येथे आणण्यात आले. या गणपतीसमोरच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांची पत्नी रमाबाई त्यानंतर सती गेल्या. त्यांच्या स्मरणार्थ येथे बाग तयार करण्यात आली असून त्याला रमामाधव स्मारक असे म्हटले जाते. मंदिराच्या आवारातच सती रमाबाईंचे वृंदावन आहे.

मुळा-मुठा नदींने वेढलेले हे श्री क्षेत्र थेऊर पुणे-सोलापूर रेल्वेमार्गावर पुण्यापासून २५ कि.मी. अंतरावर असलेल्या लोणी गावापासून फक्त सात कि.मी.वर आहे.

**संकलन - शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख ६

**गिरिजेचा आत्मज (पुत्र) लेण्याद्रीचा गिरिजात्मज**

सह्याद्रीच्या डोंगर रांगांनी वेढलेल्या जुन्नर तालुक्याच्या उत्तरेला असणाऱ्या डोंगररांगांमधील लेण्या ह्या पुरातन तसेच प्रसिद्ध आहेत.

या लेण्यांमधील ८ व्या गुहेत, अष्टविनायकातील ६ व्या स्थानावर असणारे गिरिजात्मज गणपतीचे मंदिर आहे. या मूर्तीमुळे इथे असलेल्या २८ लेण्यांना ‘गणेश लेणी’ असे म्हणतात. हा भाग गोळेगाव या गावाच्या हद्दीमध्ये आहे. जवळूनच कुकडी नदी वाहते. पौराणिक कथांमध्ये ठिकाणाचा उल्लेख ‘जीर्णापूर’ व ‘लेखन पर्वत’ असा झाल्याचे आढळते. हिमकन्या आणि शिवपत्नी पार्वती हिला विनायकाने आपल्या पोटी जन्म घ्यावा अशी इच्छा होती. म्हणून तिने लेण्याद्रीच्या गुहेत बारा वर्षे कठोर तप केले. याकालावधीत पार्वती मातीची मूर्ती करुन विनायकाची पूजा करत असे. तिच्या तपश्चर्याने प्रसन्न होऊन गणेश बटूस्वरुपात पार्वतीच्या समोर प्रकट झाले आणि या लेण्याद्रीमध्येच वास्तव्य करुन राहिले.

गिरिजात्मज स्वरुपातच त्याने अनेक दुष्टंचा संहार करुन सज्जनांचे रक्षण केले. शेष, इंद्र, यम यांचे गर्वहरण केले आणि आपले अवतारकार्य संपल्यावर याच लेण्याद्रीमध्ये गुप्त झाला. पार्वतीने ज्या गुहेत तपश्चर्या केली असा समज आहे त्याच गुहेमागे सध्याची गणेशमूर्ती आहे असे म्हटले जाते.

जुन्नरमधे भारतातील सर्वात मोठा बुद्ध लेणीं समूह असून तिथे झालेले कोरीव कामाची संख्या ३२५ आहे! यात चैत्यगृह, विहार, पोढी व लेणी आहेत. यातील प्रमुख बुद्ध लेणीं समूह म्हणजे लेण्याद्री बुद्ध लेणीं. येथील विहारात मध्यभागी प्रशस्त मंडप असून तीन बाजूला वेगवेगळ्या आकाराचे २० निवासकक्ष आहेत.

या विहारात प्रवेशासाठी दगडात कोरलेल्या पायऱ्यांचा जीना आहे. जिन्याच्या शेवटी स्तंभ असलेल्या व्हरांड्यातील मधल्या दारातून विहार प्रवेश करता येतो. येथील दोन निवासकक्ष एकत्र करून भिंतीत कोरलेल्या गणपतीचा आकार देण्यात आला तिथे गिरिजात्मज गणपतीची स्थापना करण्यात आली आहे.

हा गणपती अष्टविनायकांपैकी एक महत्वाचा गणपती असून गिरीजात्मज नावाने प्रसिद्ध आहे. (हे पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी लिहून ठेवले आहे व भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण देखील हे मान्य करते) व  हे देवस्थान लेण्यांमध्ये आहे म्हणून याला लेण्याद्री असे नाव पडले.

गिरिजात्मज गणेशाच्या मंदिरात येण्यासाठी ३०७ पायऱ्या चढाव्या लागतात. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे हे पूर्ण देऊळ एका अखंड दगडापासून बनले आहे.

ही गुहा अशा प्रकारे बनवली आहे की जोपर्यंत आकाशात सूर्य आहे तोपर्यंत प्रकाश आत येत राहणार. निसर्गाच्या अमोल देणगीची मुक्त हस्ताने उधळण असणारे हे स्थान भौगोलिक, ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या अलौकिक आहे.

एकंदरीत मंदिराचे भौगोलिक स्थान पाहता, येथे सकाळी लवकर भेट देणे हे सोयीचे ठरते. हिवाळ्यामध्ये येथील हवामान थंड असल्याने पायऱ्या चढणे सोपे जाते. परंतु ज्यांना लेण्याद्रीतील धबधब्यांचे सौंदर्य पाहायचे असेल अश्यानी पावसाळ्यात भेट देणे योग्य ठरेल. (पावसाळ्यात येथील रस्ते, वाटा या घसरड्या असू शकतात.)

हे स्थान पुण्याहून साधारणपणे १०० किमी आहे. पुणे–नाशिक महामार्गाने (NH 60) नारायणगावपर्यंत जाऊन तेथून जुन्नर रस्त्याने येथे पोहोचता येते. प्रवासासाठी सुमारे अडीच ते तीन तास लागतात. जुन्नर बस स्थानकावरून (लेण्याद्रीपासून सुमारे ७ किमी) स्थानिक रिक्षा किंवा मिनी बसेस लेण्याद्रीच्या पायथ्यापर्यंत  मिळतात.

**संकलन – शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈

# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख ७

विघ्नहरी विघ्नहर्ता : ओझरचा विघ्नेश्वर

भक्तांवर येणारी संकटे, विघ्ने यांचे हरण करून त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवणारा अष्टविनायकतील सातवा गणपती म्हणजेच, ओझरचा विघ्नेश्वर किंवा विघ्नहर होय. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यामध्ये कुकडी नदीच्या काठी विघ्नेश्वराचे मंदिर आहे.

पौराणिक कथेनुसार हेमवती नावाची नगरी होती. तेथे अभिनंदन नावाचा राजा राज्य करीत होता. एकदा त्याला आपण इंद्रपद मिळवावे असे वाटू लागले. सत्तेच्या लोभाने मदांध झालेल्या राजाने इंद्रपद प्राप्तीसाठी यज्ञ सुरु केला. यज्ञात सर्व देवदेवतांसाठी योग्य ती आहुती दिली जाणार होती. परंतु इंद्राचे राज्य घेण्यासाठी यज्ञ असल्याने इंद्रासाठी मात्र तशी आहुती नव्हती. नारदमुनींना हे समजले. ते धावतच इंद्राकडे गेले.

नारदमुनिंनी अभिनंदन राजाच्या यज्ञाची व तो इंद्राचा या यज्ञात योग्य तो सन्मान करीत नसल्याची हकीकत वर्णन करुन सांगितली. ती वार्ता ऐकली आणि इंद्र संतापला. त्याच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली. इंद्राने काळाचे स्मरण केले. काळाने तात्काळ विघ्नासुराचा अवतार धारण केला. विघ्नासूर पृथ्वी तलावर आला सर्व वैदिक कार्याचा नाश करण्याचा सपाटा त्यांने लावला. सर्व देव भयभीत झाले. तेव्हा सर्व देव श्रीगणेशाला शरण गेले. त्यावेळी श्रीगणेशाचे पराशर ऋषिंच्या आश्रमात वास्तव्य होते. श्री गणेशाने देवांना अभय दिले. आणि पार्श्वपुत्राचे रुप घेतले.

श्रीगणेश व विघ्नासूर यांचे तुंबळ युध्द झाले. काळरुपी विघ्नासुराने अनेक रुपे बदलली, परंतु अखेरीस श्रीगणेशाने त्याला पकडले. विघ्नासूर श्रीगणेशास शरण आला. त्याने अभय मागितले. श्रीगणेशाने त्याला सांगितले ठीक आहे. तुला जिवदान देतो. मात्र जेथे माझे भक्त माझी पूजा-अर्चा, स्मरण करत असतील तेथे तू असता कामा नये. विघ्नासूराने ते कबूल केले. परंतु पुन्हा एक विनंती करीत म्हटले श्रीगणेशा तुझ्या नावाप्रमाणे माझं नांव असावे, अशी इच्छा आहे.

शरणागत रक्षक श्री गणेशाने विघ्नासुराचे मान्य केले आणि तेव्हा पासून श्रीक्षेत्र ओझरचा श्रीगणेश विघ्नेश्वर, विघ्नहर म्हणून ओळखला जाऊ लागला.

श्री विघ्नेश्वर गणेशाचा गणेशोत्सव हा भाविकांसाठी मोठा आनंदोत्सव असतो. हा उत्सव दरवर्षी भाद्रपद शुध्द प्रतिपदा ते पंचमी असा पाच दिवस चालतो.

पहिल्या दिवशी श्रीं ची पालखी पूर्वद्वारी उंब्रज या गावाला जाते. तेथे लक्ष्मी-नारायणाचे पूजन होते.

दुसऱ्या दिवशी दक्षिण द्वाराला म्हणजे धनगरवाडी येथे जाते. तेथे उमा-महेश्वराची पूजा होते.

तृतियेला पालखी शिरोली खुर्द येथे पश्चिमद्वारी जाते. तेथे रति-मदनाची पूजा केली जाते.

चवथ्या दिवशी पालखी उत्तरद्वारी आमराई येथे जाते तेथे सूर्य-पृथ्वी यांचे पूजन होते.

शेवटी पंचमीला श्री विघ्नेश्वराच्या अवताराचे पूजन होवून या आनंदोत्सवाची सांगता करण्यात येते.

या कालावधीमध्ये मोरया गोसावी यांच्या पदांचे गायन केले जाते. तसेच सनई चौघड्याचे अखंड वादन केले जाते. त्याचप्रमाणे दरवर्षी माघ शु. चतुर्थीला गणेश जयंती सोहळा साजरा करीत असताना अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो.

१७८५ मध्ये श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे बंधू श्रीमंत चिमाजी आप्पा यांनी हे देऊळ बांधून त्यावर सोनेरी कळस चढविला.

श्री विघ्नेश्वर गणेश मंदीर पूर्वाभिमुख असून ते बंदिस्त आहे. चारही बाजूंनी उत्तम स्थितीत असलेली दगडी तटबंदी असून, पूर्वेच्या महाद्वारातून आत प्रवेश केला की, दोन उंच दगडी दिपमाळा दिसतात. त्यावर त्रिपुरारी पौर्णिमेला दिपोत्सव साजरा केला जातो.

मुख्य मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ दोन्ही बाजूने दगडात कोरलेले भालदार, चोपदार आहेत. महाद्वाराच्या आंत दोन्हीबाजूंना

२५ ते ३० फूट लांबीच्या व रुंदीच्या ओवऱ्या आहेत. ओवऱ्यांना डौलदार कमानी असून उजव्या बाजूच्या ओवरी खाली तळघर आहे. महाद्वारात एक व आत एक असे सभामंडप आहेत.

मंदिरात प्रवेश केल्यानंतर दर्शन गाभारा व दुसऱ्या गाभाऱ्यामध्ये प्रवेशद्वारात श्री विघ्नेश्वराकडे तोंड करुन हातात मोदक घेतलेल्या मूषकराज यांची मूर्ती आहे.

दुसऱ्या गाभाऱ्यातून आत गेल्यावर तिसऱ्या गाभाऱ्यात श्री विघ्नेश्वराची पूर्णाकृती बैठी मूर्ती डौलदार अशा कमानीत विराजमान झालेली दिसते.

कमानीला चांदीची मखर बनविलेली असून श्री विघ्नेश्वराची मूर्ती ही पूर्वाभिमुख आहे.

डाव्या सोंडेची असणाऱ्या मूर्तीच्या दोन्ही डोळ्यात माणके आणि कपाळावर हिरा आहे. तसेच या मूर्तीच्या बेंबीत हिरा बसवलेला असून श्रीविघ्नेश्वराच्या सर्वांगाला शेंदूर लावलेला असल्याचे दिसून येते.

श्री विघ्नेश्वराच्या दोन्ही बाजूला कमानीत रिध्दी–सिध्दी यांच्या पितळी मूर्ती विराजमान आहेत. गाभाऱ्यात चारही बाजुंनी छोटे–छोटे कोनाडे असून त्यात पंचायतनाच्या मूर्ती आहेत.

पुणे–नाशिक रस्त्यावर जुन्नर तालुक्यातील हे देवस्थान नारायणगावापासून ८ कि.मी. अंतरावर आहे. जुन्नर जाण्यासाठी जवळचे रेल्वे स्थानक पुणे आहे. जुन्नर पासून खाजगी वाहने, टॅक्सी किंवा रिक्षाने जाता येते.

**संकलन – शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈



# अष्टविनायका तुझा महिमा असा!
# लेख ८

**रांजणगावचा देव महागणपती**

त्रिपुरासुर नावाचा एक अत्यंत बलाढ्य राक्षस शिवाच्या कठोर तपस्येमुळे अमरत्वाचे वरदान मिळवून अजेय बनला. त्याच्या अहंकाराने संपूर्ण विश्वात हाहाकार माजवला. सर्व देवांना त्याने पराभूत केले. सर्व देव हिमालयात दडून बसले. त्रिपुरासूर मोठ्या ऐटीत इंद्राच्या आसनावर जाऊन बसला. त्रिपुरासुराचे दोन सेनापती भीमकाय व वज्रदंत यांनी भूलोकी सर्वांना त्रास देण्यास प्रारंभ केला. स्वर्गलोक आणि पृथ्वीवरील संत-मुनी त्रस्त झाले. शेवटी देवांनी भगवान शिवांकडे मदतीची याचना केली. पुढे त्रिपुरासुर व भगवान शंकर यांच्यात तुंबळ युद्ध झाले. भगवान शंकराने 'प्रणम्य शिरसा देवम्' या गणेश वंदनेच्या श्लोकाचे स्मरण करून, एका बाणात त्रिपुरासुराचा वध केला. कार्तिक शुद्ध पौर्णिमेला ही घटना घडली म्हणून या दिवसाला 'त्रिपुरी पौर्णिमा' म्हणतात. शंकराने गणेशाचे जेथे स्मरण केले ते मणिपूर गाव होय. तिथे शंकराने गजाननाची स्थापना केली. आज तेच गाव रांजणगाव म्हणून ओळखले जाते.

भाद्रपद शुद्ध चतुर्थी अर्थात गणेश चतुर्थीला इथे खूप मोठ्या प्रमाणावर गणेशाचा उत्सव साजरा केला जातो. भाद्रपद शुद्ध प्रतिपदा ते भाद्रपद शुद्ध पंचमी या पाच दिवसांच्या कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भक्ताला देवाच्या गाभाऱ्यात अगदी मूर्तीपर्यंत जाऊन दर्शन घेता येते, त्यामुळे या काळात दर्शनासाठी भाविकांची इथे रीघ लागलेली असते.

रांजणगावचे श्री महागणपतीचे मंदिर पूर्वाभिमुख असून, मुख्य रस्त्यावर उजवीकडे आहे. महागणपतीच्या मूळ मूर्तीला महोत्कटफ असे नाव असून, तिला दहा सोंडा व वीस हात आहेत, असे म्हणतात, परंतु ती तळघरात ठेवलेली आहे असे सांगितले जाते. येथील पूजेकरिता ठेवलेल्या मूर्तीच्या बाजूला ऋद्धी-सिद्धी आहेत.

या मंदिराचा सभामंडप सरदार किबे यांनी, तर गाभारा आणि तळघर श्रीमंत माधवराव पेशव्यांनी बांधला असून शिंदे, होळकर आदी सरदारांनीही बांधकाम तसेच इनामाच्या स्वरूपात मोठे साहाय्य दिले आहे.

बांधकाम करताना उत्तम दिशासाधन साधले असल्यामुळे उत्तरायण आणि दक्षिणायन यांच्या मध्यकाळात सूर्याची प्रकाशकिरणे देखील झळाळत्या सोनेरी तेजाचे आवरण लेऊन महागणपतीच्या पूजेसाठी येतात. अशा वेळी शेंदूर लावलेली महागणपतीची मूर्ती अधिकच आकर्षक भासते. सभामंडपातून आत गेल्यावर गाभाऱ्यात गणेशाची डाव्या सोंडेची आसन घातलेली रेखीव मूर्ती आहे. मूर्तीचे कपाळ रुंद असून दोन्ही बाजूंना ऋद्धी-सिद्धी आहेत. या मूर्तीच्या खालच्या बाजूला तळघर आहे. दरवाजापाशी जय व विजय हे दोघे रक्षक आहेत. गणेश चतुर्थीच्या दोन दिवस आधी व त्या दिवशी या ठिकाणी मुक्त प्रवेश असतो.

पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर व पुण्यापासून ५० किलोमीटरवर रांजणगाव येथे हे देऊळ आहे. पूर्वी साधे-सुधे असणारे मंदिर आता आद्ययावत सोयींसुविधानी सुसज्ज करण्यात आल्या आहेत. मंदिराच्या आसपासच्या सर्व परिसराचे नव्याने सुशोभीकरण करण्यात आले आहे. पुणे-शिरूर-अहिल्यानगर मार्गाने जाणाऱ्या- येणाऱ्या बसने रांजणगांव येथे उतरता येते.

**संकलन - शब्दांकन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**


आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज !
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे !
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !
करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.bank.in
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त
Date of Publication : 26/08/2026 and
Date of Posting : 28/08/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

- मासिक मुल्य रु. २०/-
- वार्षिक वर्गणी रु. २००/-
- त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

0000

## * हिंदुबोध जाहिरात दरपत्रक *

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रु. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/- |

## * हिंदुबोधची वर्गणी *

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

व्दारा : श्रीपाद श्रीकांत रामदासी.
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१